ePaper
# आता शहरी नक्षलवाद्यांची खैर नाही, जनसुरक्षा विधेयक मंजूर!
| वर्ष - 8 | अंक - 332 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज TM

आतील पानांत
- मित्रांनो पुन्हा एकदा सुरू झालं, बोरिंग..!
- मोहम्मद सिराज- रूटमध्ये बाचाबाची
- उदयपूर फाईल्स प्रदर्शित होण्यास स्थगिती
- सरकारी संस्थांवर बलुचिस्तानचे हल्ले

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 11 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा अचानक दिल्ली दौरा ; अधिवेशन मुंबईत, शिंदे दिल्लीत ; चर्चांना उधाण !

# एकनाथ शिंदेंचा 'सायलेंट स्ट्राईक' !

## अमित शाह, राजनाथ, गडकरी, अजित डोवाल यांच्या गाठीभेटी ; रात्री उशिरा गुप्त बैठका !

| मुंबई / नवी दिल्ली | प्रतिनिधी | महाईन्यूज



**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी पावसाळी अधिवेशन सोडून अचानक दिल्ली गाठल्यामुळे चर्चांना ऊत आला आहे. बुधवारी रात्री उशिरा एकनाथ शिंदे दिल्लीला पोहोचले आणि त्यांनी रात्री गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची गोपनीय भेट घेऊन प्रदीर्घ चर्चा केल्याचे ही सांगण्यात येते. त्यांच्या या 'सायलेंट स्ट्राईक' मुळे राजकीय वातावरण मात्र ढवळून निघाले आहे.**

### उलट-सुलट चर्चेला उधाण !

महाराष्ट्राच्या राजकारणातील एकनाथ शिंदे हे आधीच वादग्रस्त नेते आहेत आणि ते कोणत्याही क्षणी काहीही करू शकतात, असा त्यांच्या नावाभोवती दबदबा देखील आहे. मुंबईत पावसाळी अधिवेशन सुरू असताना एकनाथ शिंदे यांनी दिल्ली का गाठले? याचे गौडबंगाल मात्र कायम आहे. शिंदे यांच्या सहकाऱ्यांनी किंवा विश्वासू कार्यकर्त्यांनी याबाबत कमालीचे मौन बाळगले आहे.

### अनेक राजकीय तर्क-वितर्क..

शिंदेंच्या या दौऱ्यामुळे राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे दिल्लीत वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या आहेत. अधिवेशनाचा दुसरा आठवडा सुरू असून यात विविध महत्त्वाची विधेयके मांडली जाणार आहेत, त्याबाबत चर्चेसाठी ते गेले असावेत, असा एक सूर आहे

### देवेंद्र फडणवीस यांची नाराजी?

दुसरीकडे, शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीन चालकाला केलेल्या मारहाणीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही नाराज असल्याचे बोलले जाते. विधान परिषदेत हा मुद्दा जेव्हा उपस्थित झाला, तेव्हा फडणवीसांनी सभापती आणि विधानसभा अध्यक्षांनी या प्रकाराची दखल घ्यावी आणि यावर काय कारवाई करायची त्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस केली आहे.

### उद्धव-राज ठाकरे बंधूंचे मनोमीलन..

दरम्यान, राज्यात उद्धव आणि राज ठाकरे बंधू एकत्रित येण्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यात हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकाच व्यासपीठावर आले. तब्बल १८ वर्षांनी हे दोन्ही बंधू एकत्र आल्याने राजकीय समीकरणेही बदलण्याची चर्चा सुरू झाली. त्यात, एकनाथ शिंदे यांनी एका कार्यक्रमात 'जय गुजरात' अशी घोषणा दिल्याने विरोधकांनी त्यांना धारेवर धरले, तो देखील मुद्दा आहे.

### मीरा रोड येथील मोर्चा

मीरारोड येथे झालेल्या मराठी भाषिकांच्या मेळाव्याला पोलिसांनी परवानगी नाकारली. याठिकाणी पोलिसांच्या दबावाला न झुकता मराठी माणूस एकवटल्याचे चित्र दिसून आले. या मोर्चात शिंदेसेनेचे नेते मंत्री प्रताप सरनाईक गेले असता त्यांना आंदोलकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. सरनाईक यांना मराठी भाषिकांनी विरोध करताच त्यांना मोर्च्यातून काढता पाय घ्यावा लागला, हे महत्त्वाचे मुद्दे आहेतच.

### फडणवीस यांचीच खेळी!

ठाकरे बंधू एकत्रित येण्या मागील खेळी देवेंद्र फडणवीस यांचीच असल्याचे माजी आमदार इम्तियाज जलील यांनी दावा केला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी एकनाथ शिंदे यांना वरचढ होऊ द्यायचे नाही, त्यासाठी भाजपा प्रयत्न करत आहे, असे त्यांनी म्हटले आहे. मराठी विजयी मेळाव्यात राज ठाकरे यांनीही जे बाळासाहेबांना जमले नाही, ते देवेंद्र फडणवीस यांना जमले असा मार्मिक टोला लगावला होता. त्यामुळे राज्यात सुरू असणारा हिंदी विरुद्ध मराठी वाद यात सर्वाधिक कोंडी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची झाल्याचे दिसून आले.

### अजितदादा बोलले...

हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी थेट पहिली ते पाचवी हिंदी नको, अशी स्पष्ट भूमिका घेतली होती. त्यामुळे बाळासाहेबांचे विचार आम्ही पुढे घेऊन चाललो आहोत, असे म्हणणाऱ्या शिंदेसेनेच्या नेत्यांनी हिंदी सक्तीवर ठाम भूमिका घेणे टाळले, अशी जनतेत चर्चा सुरू होती, याबाबतही चर्चा झाली असण्याची शक्यता आहे.

### उबाठा गटाचा टोला : गुरुपौर्णिमा असल्याने गेले असावेत!

एकनाथ शिंदे यांच्या या अचानक दिल्ली दौऱ्यामुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले असतानाच उद्धव ठाकरे गटाने मात्र त्यांना चिमटा काढला आहे. त्यांचा पक्ष हा शाहासेना असल्यामुळे आणि गुरुपौर्णिमेचा दिवस असल्यामुळे गुरूंची भेट घेण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत पोहोचले असावेत. कदाचित, अनेक प्रकरणात त्यांच्याविषयी नकारात्मक गोष्टी दिल्ली पोहचल्या आहेत, त्यामुळे त्यांची कानउघाडणी करण्यासाठी त्यांना बोलावून घेतले असावे, अशी टीकाही उबाठा गटाने केली आहे.

### राज्यातील घडामोडींमुळे शिंदेंना महत्त्व..

राज्यातील एकंदर घडामोडी आणि राजकीय वातावरण या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यातच त्यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत शिंदे यांना प्राप्तिकर विभागाने नोटीस बजावल्यामुळे एकनाथ शिंदे यांची ही धावपळ सुरू असल्याचे तर्कही काहींनी लढवले, तर मंत्री उदय सामंत म्हणाले, की आमची शिवसेना ही महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करणारी आहे. त्यामुळे निधी आवश्यक असला की केंद्र सरकारकडे चर्चेसाठी आम्ही धाव घेतो. एकनाथ शिंदे यांचा हा दौरा महाराष्ट्राच्या भल्यासाठीच असेल, असे ते म्हणाले.

# नर्तकाने नृत्याबद्दल लिहायला हवे!

## ज्येष्ठ कथक गुरू शमा भाटे यांनी व्यक्त केले मत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नर्तकाने नृत्याबद्दल लिहायला हवे, अनुभव व्यक्त करायला हवेत. त्यानेच नवे विद्यार्थी घडतात. त्यांना प्रोत्साहन मिळते,' असे मत ज्येष्ठ कथक गुरू शमा भाटे यांनी गुरूवारी व्यक्त केले. मनीषा नृत्यालयाच्या वतीने कथक गुरू भाटे यांच्यासह सुचेता भिडे-चापेकर आणि रोशन दाते यांच्या हस्ते कथक नृत्य शिक्षणपद्धतीवर आधारित 'कथकानुगमन' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. लेखिका मनीषा साठे, प्रकाशक पराग पिंपळे या वेळी उपस्थित होते.**

त्या वेळी त्या बोलत होत्या. याच कार्यक्रमात पुस्तकाचे शब्दांकन करणाऱ्या पायल गोखले, भाषा संस्करण करणाऱ्या मानसी गदो, इंग्रजीत भावानुवाद करणाऱ्या अदिती कुलकर्णी, मुखपृष्ठ साकारणाऱ्या कीर्ती कुरंडे यांना सन्मानित करण्यात आले.भाटे म्हणाल्या, 'दीर्घ काळ नृत्य शिक्षक म्हणून काम करणे, विद्यार्थ्यांना घडवणे अवघड काम आहे. सातत्याने नृत्य शिकवत राहणे, कष्टाचे काम असते. त्यामुळे नृत्य शिक्षकाने, नर्तकाने त्याचे अनुभव लिहायला हवेत. नवे विद्यार्थी घडवायला हवेत.''कथक किंवा कोणतीही कला मोठ्या कष्टाने जोपासावी लागते. त्यासाठी अंगभूत कला गुणांना वाव मिळणे, गरजेचे असते. कला शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे,' असे सांगून दाते यांनी साठे यांच्या पुस्तकातील काही उताऱ्यांचे वाचन केले. चापेकर म्हणाल्या, 'पुण्यात कथक शिकणाऱ्या



मुला मुलींचे प्रमाण कमी आहे. मात्र, शिक्षकाने मुलांना आणि मुलींना शिकवताना सर्व बारकावे विचारातून घेऊन दोघांनाही सर्व पैलूंचे शिक्षण द्यायला हवे. साठे यांनी परंपरा आणि नवता यांचा संगम साधून पुस्तकातूनही कथक शिक्षणाचे धडे दिले आहेत. त्यामुळे सर्व विद्यापीठांमध्ये, कला विभागांमध्ये 'कथकानुगमन'चा समावेश करायला हवा.'शिष्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने कथक शिक्षणाची सुसंगत, सखोल दिशा सापडावी म्हणून पुस्तकाची निर्मिती करण्यात आली. त्यात कथक शिकवताना आलेल्या अनेक अनुभवांचा समावेश आहे. कथक शिकणाऱ्या, शिकवणाऱ्या सर्वांनाच हे पुस्तक उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.मनीषा नृत्यालयाच्या वतीने कथक गुरू भाटे यांच्यासह सुचेता भिडे-चापेकर आणि रोशन दाते यांच्या हस्ते कथक नृत्य शिक्षणपद्धतीवर आधारित 'कथकानुगमन' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

### नवे विद्यार्थी घडवायला हवेत

मात्र, शिक्षकाने मुलांना आणि मुलींना शिकवताना सर्व बारकावे विचारातून घेऊन दोघांनाही सर्व पैलूंचे शिक्षण द्यायला हवे. साठे यांनी परंपरा आणि नवता यांचा संगम साधून पुस्तकातूनही कथक शिक्षणाचे धडे दिले आहेत. त्यामुळे सर्व विद्यापीठांमध्ये, कला विभागांमध्ये 'कथकानुगमन'चा समावेश करायला हवा. कष्टाचे काम असते. त्यामुळे नृत्य शिक्षकाने, नर्तकाने त्याचे अनुभव लिहायला हवेत. नवे विद्यार्थी घडवायला हवेत.''कथक किंवा कोणतीही कला मोठ्या कष्टाने जोपासावी लागते. त्यासाठी अंगभूत कला गुणांना वाव मिळणे, गरजेचे असते. कला शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे,' असे सांगून दाते यांनी साठे यांच्या पुस्तकातील काही उताऱ्यांचे वाचन केले.

लेखिका मनीषा साठे, प्रकाशक पराग पिंपळे या वेळी उपस्थित होते. भाटे म्हणाल्या, 'दीर्घ काळ नृत्य शिक्षक म्हणून काम करणे, विद्यार्थ्यांना घडवणे अवघड काम आहे. सातत्याने नृत्य शिकवत राहणे, कष्टाचे काम असते. त्यामुळे नृत्य शिक्षकाने, नर्तकाने त्याचे अनुभव लिहायला हवेत. नवे विद्यार्थी घडवायला हवेत.''कथक किंवा कोणतीही कला मोठ्या कष्टाने जोपासावी लागते.त्यासाठी अंगभूत कला गुणांना वाव मिळणे, गरजेचे असते. कला शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे,' असे सांगून दाते यांनी साठे यांच्या पुस्तकातील काही उताऱ्यांचे वाचन केले. चापेकर म्हणाल्या, 'पुण्यात कथक शिकणाऱ्या मुला मुलींचे प्रमाण कमी आहे.

# बससेवेने 'पीएमपी'च्या तिजोरीत भर

## पर्यटन स्थळांवरील बससेवेने सहा महिन्यांत 20 लाख जमा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुटीच्या कालावधीत बससेवेला अल्प प्रतिसाद मिळत असल्याने हा तोटा भरून काढण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) पर्यटन आणि धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सुरू केलेल्या बससेवेला प्रवाशांचा प्रतिसाद मिळत असून, 'पीएमपी'च्या तिजोरीत भर पडली आहे. गेल्या सहा महिन्यांत २० लाख रुपये महसूल जमा झाला आहे.**



सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला अल्प प्रतिसाद असल्याने गर्दी असलेल्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांच्या ठिकाणी अतिरिक्त सेवा वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे महसुलात वाढ झाली आहे. 'पुणे दर्शन' आणि 'पर्यटन बस'सेवेच्या माध्यमातून जानेवारी महिन्यात ३.४७ लाख रुपये, फेब्रुवारीत २.१७ लाख रुपये, मार्च महिन्यात २.३६ लाख रुपये, एप्रिल महिन्यात १.५६ लाख रुपये, मेमध्ये ४.७५ लाख रुपये आणि जून महिन्यात सर्वाधिक ६.४८ लाख रुपये असे २०.८० लाख रुपये उत्पन्न मिळाल्याची माहिती 'पीएमपी' प्रशासनाकडून देण्यात आली.पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उपनगरातील शाळा, महाविद्यालये, सरकारी-खासगी कार्यालये, तसेच औद्योगिक आणि आयटी क्षेत्रातील कंपन्यांना शनिवारी, रविवारी सुटी असते. त्यामुळे दैनंदिन संचलनातील 'पीएमपी'च्या मार्गिकांवर प्रवाशांचा अल्प प्रतिसाद असतो. त्याचा महसुलावर परिणाम होत असल्याने पीएमपी प्रशासनाने अल्प प्रतिसाद असलेल्या मार्गांवरील सेवेची वारंवारिता कमी करून जिल्ह्यातील पर्यटनस्थळांपैकी कानिफनाथ गड, संगमेश्वर मंदिर (सासवड),

### वाहतूक व्यवस्थेला अल्प प्रतिसाद

या सेवांना प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला अल्प प्रतिसाद असल्याने गर्दी असलेल्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांच्या ठिकाणी अतिरिक्त सेवा वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे महसुलात वाढ झाली आहेआणि जून महिन्यात सर्वाधिक ६.४८ लाख रुपये असे २०.८० लाख रुपये उत्पन्न मिळाल्याची माहिती 'पीएमपी' प्रशासनाकडून देण्यात आली.

जेजुरी दर्शन, कोंढणपूर, बनेश्वर, निळकंठेश्वर, सिंहगड पायथा, रामदरा, तुळापूर, भंडारा डोंगर पायथा, हडशी कमान, प्रतिशिर्डी, चिन्मय विभूतियोगसाधना केंद्र, श्रीक्षेत्र खंडोबा मंदिर (निमगाव दावडी), श्री गजानन महाराज मठ (आळंदी) अशा अनेक ठिकाणी माफक दरात पीएमपीची वातानुकुलित ई-बससेवा उपलब्ध केली आहे. हडपसर, पुणे स्टेशन आणि स्वारगेट या ठिकाणांहून त्या त्या मार्गावर ती सुरू आहे. या ठिकाणी जाण्यासाठी १५ ते २० प्रवाशांनी एकत्रित आरक्षण केल्यावरही अतिरिक्त बससेवा उपलब्ध करून देण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे पीएमपीच्या पुणे दर्शन आणि पर्यटन सेवेला प्रवाशांचा प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे.सुटीच्या कालावधीत अल्प प्रतिसाद असलेल्या मार्गांवरील सेवा कमी करून गर्दी असलेल्या पर्यटनस्थळांवर मे महिन्यापासून बससेवा वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आयटी फोरमच्या शिष्टमंडळाला आश्वासन

# “हिंजवडी आयटी पार्क” समस्यामुक्त करण्यासाठी “सिंगल पॉईंट ॲथॉरिटी”

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने विधान भवनात मॅरेथॉन बैठक

### आ. राहुल कुल, आ.महेश लांडगे यांची लक्षवेधी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी आयटी पार्कची समस्या सोडवण्यासाठी मेट्रोचे काम डिसेंबर अखेर पूर्ण करण्यात येईल. वाहतूक सक्षम करण्यासाठी प्रस्तावित रस्ते आणि संबंधित विकासकामे मार्गी लावण्यासाठी सर्व शासकीय अस्थापनांसाठी “सिंगल पॉईंट ऑथॅरिटी” तयार केली जाईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

हिंजवडी आयटी पार्कमधील वाढत्या नागरी व वाहतूक समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी IT फोरम आणि सोसायटी फेडरेशनच्या प्रतिनिधींनी आज विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची यांची भेट घेतली. ही महत्त्वपूर्ण बैठक भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आयोजित केली होती. यावेळी आमदार शंकर मांडेकर, आमदार शंकर जगताप उपस्थित होते.

आयटी फोरमचे सचिन लोंढे, सोसायटी फेडरेशनचे संजीवन सांगळे यांच्यासह शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यासोबत थेट चर्चा केली. बाणेर-बालेवाडी रेसिडेन्ट असोसिएशन, #UNCLOGHinjawadiITPark मोहीमेतील प्रतिनिधी, फोरम ऑफ आयटी एम्प्लॉईज, हिंजवडी एम्प्लॉईज ॲन्ड रेसिडेन्ट ट्रस्ट, मुळशी को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी फेडरेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शेखर सिंह, पुणे महानगरपालिका आयुक्त नवकिशोर राम, ‘पीएमआरडीए’चे महानगर आयुक्त योगेश म्हसे, राज्य सरकाचे मुख्य सचिव, एमआयडीसी, प्रोजेक्ट डायरेक्टर नॅशनल हायवे, पोलीस आयुक्त पिंपरी-चिंचवड विनयकुमार चौबे, कार्यकारी संचालक महामेट्रो श्रावण हर्डिकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रशासनाची तयारी आणि कार्यवाहीची माहिती दिली.



> “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयटी फोरम आणि विविध सोसायटी फेडरेशनच्या शिष्टमंडळाला सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी संबंधित शासनाच्या विभागांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. हिंजवडी आयटी पार्क आणि पुणे, पिंपरी-चिंचवड परिसर ट्रॅफिक मुक्त करण्यासाठी सर्व शासकीय अस्थापनांचे नियंत्रण विभागीय आयुक्त पाहतील, असे आदेश मुख्यमंत्री महोदय यांनी दिले आहेत. तसेच प्रस्तावित रस्ते आणि पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी ‘फास्टट्रॅक’ वर कालबद्ध नियोजन करण्यात येणार आहे. हिंजवडी आयटी पार्कच्या समस्यांबाबत पहिल्यांदाच अशी बैठक घेण्यात आली आणि विशेष म्हणजे फलदायी ठरली आहे.
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### मुख्यमंत्री फडणीस यांचे प्रशासनाला निर्देश

1. सर्व विभागांच्या समन्वयासाठी “सिंगल पॉईंट ॲथॉरिटी”
2. भूमीसंपदानाच्या कामासाठी पीएमआरडीएने पुढाकार घ्यावा.
3. लक्ष्मी चौक येथील पूल सहापदरी करा.
4. डिसेंबर अखेर हिंजवडी मेट्रो सुरू करा.
5. एमआयडीसीने रस्ता रुंदीकरणाची कामे पूर्ण करावी.
6. मेट्रो प्रशासनाने पार्किंगचे प्रोव्हीजन करावे.
7. एक महिन्यामध्ये टीडीआर द्या आणि भूसंपादन करा.
8. अध्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून वाहतूक नियंत्रण करा.
9. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने वाहतूक संदर्भात अंमलबजावणी करावी.

हिंजवडी आयटी पार्क हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा आयटी हब असून, दररोज सुमारे पाच लाखांहून अधिक आयटी व्यावसायिक येथे ये-जा करतात. मात्र, अपुरी पायाभूत सुविधा, वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुर्दशा आणि समन्वयाचा अभाव या समस्यांमुळे रहिवासी व कर्मचाऱ्यांचे आयुष्य कठीण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर “हिंजवडी आयटी पार्कला अडथळ्यांमधून मुक्त करा” या मागणीकडे आमदार लांडगे यांनी लक्ष वेधले.

यावेळी पीएमआरडीए प्रशासनाकडून प्रस्तावित रस्ते आणि संबंधित कामांचा ‘रोड मॅप’ याबाबत मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री यांच्यासमोर प्रेझेंटेशन दिले. तसेच, पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातून हिंजवडीला जोडणारे डीपी प्रस्तावित रस्ते पूर्ण करण्यासाठी भूसंपादन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने कामाला गती द्यावी. राष्ट्रीय महामर्गाला जोडणारे रस्त्यांची प्रस्तावित कामे मार्गी लावण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत समन्वय करणार आहोत, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

---

# दिव्यांगांचे पुन्हा नव्याने सर्वेक्षण ; दोन कोटींचा खर्च

## दिव्यांगांचा डाटा उपलब्ध असताना सर्वेक्षणावर नाहक खर्च होत असल्याची टीका

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाजविकास विभाग शहरातील दिव्यांगांना दरमहा दोन हजार रुपये पेन्शन देत आहे. त्यांच्या माहितीचा डाटा महापालिकेकडे उपलब्ध आहे. असे असताना दिव्यांगांचे नव्याने सर्वेक्षण करण्याचा घाट महापालिकेने घातला आहे.**

एका दिव्यांगासाठी १३६ रुपये खर्च केला जाणार आहे. शहरात दिव्यांग असल्याचा दावा समाजविकास विभागाने केला आहे.त्यानुसार या सर्वेक्षणावर तब्बल दोन कोटी चार लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. त्यामुळे महापालिकेत प्रशासकीय राजवटीत फक्त आणि फक्त उधळपट्टी सुरू असल्याचे चित्र आहे. शहरातील दिव्यांग नागरिकांच्या घरोघरी जाऊन त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनमानाचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यासाठी समाजविकास विभागाच्या दिव्यांग कक्षाकडून १४ जानेवारी २०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये दोन कंपन्या सहभागी झाल्या होत्या. एक कंपनी अपात्र ठरली, तर पात्र असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या महात्मा गांधी सेवा संघाची १३६ रुपये दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे.



शहरामध्ये एक लाख ५० हजार दिव्यांग व्यक्ती असल्याचा अंदाज समाजविकास विभागाने वर्तविला आहे. त्यानुसार या सर्वेक्षणासाठी दोन कोटी चार लाख रुपयांचा खर्च केला जाणार आहे. हे सर्वेक्षण शहरात पाच महिन्यांत पूर्ण करणे अपेक्षित आहे. या कामाची मुदत पाच महिन्यांची असणार आहे. त्या कामास व खर्चास महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीमध्ये मान्यता दिली आहे

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



'स्टेट'मेंट
राहुल जगताप

### गुरुवंदना!

"जे जे भेटले भूत, तया मानिजे भगवंत" असे संतवचन आहे. खरंतर गुरु बाबतीतही असेच म्हणता येईल. "जो जो भेटे वाटेवरी, त्याला आपला गुरु करी" असे म्हणता येईल. आपल्याला भेटलेली प्रत्येक व्यक्ती ही काही ना काही उद्देशाने भेटणे हे परमेश्वराने नियत केलेले असते. प्रत्येकाकडून आपल्याला काही ना काही शिकायला मिळते. काही जणांकडून सकारात्मक काही शिकायला मिळाले नाही तरी कसे वागू नये ते शिकायला मिळते. मी एका कंपनीमध्ये कंपनी सचिव म्हणून काम करत होतो. बारा जणांच्या ऐसपैस संचालक मंडळात कॉर्पोरेट जगतातील "हूज हू" म्हणता येईल अशी व्यक्तिमत्वे होती. त्यांच्यामध्ये काही जणांकडून नक्कीच खूप काही शिकायला मिळाले आणि ते पुढील जिवनात खूप उपयोगी सुद्धा पडले. विचार करण्याची पद्धत बदलली, कुठल्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देण्यामध्ये थोडीफार परिपक्वता आली, बोलणं, वागणं, बसणं यामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडत गेला. पण काही असेही होते की ज्यांच्याकडून कसे वागू नये, कसे बोलू नये याचे पाठ मिळाले. त्यामुळे त्यांचेही खरोखर मी कृतज्ञ राहिलाच हवे. आपल्या आयुष्याच्या प्रवासात भेटणाऱ्या व्यक्ती आपल्याला आयुष्याचे पाठ देत असतात. आपल्याला भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून आपल्याला अनुभव तरी मिळतो किंवा धडा मिळतो. एखादी व्यक्ती पुढे गेल्यानंतर आपण इतरांशी बोलतो की त्याने असे वागायला नको होते. खरंतर याचा उत्तरार्ध असा असावा की यातून शिकून आपण आपण असे कसे वागणार नाही याबाबत काळजी घेण्याचा प्रयत्न करणे. तर मग अशा अर्थाने ती व्यक्ती आपली गुरु ठरते की. त्यामुळे एखाद्या ठिकाणी नको तसे वागणाऱ्या, नको तसे बोलणाऱ्या व्यक्तीबद्दल तिरस्कार व्यक्त करण्यापेक्षा त्याने आपल्यावरती जो सकारात्मक परिणाम केलेला आहे त्याबद्दल त्याचे आभार मानले पाहिजेत. अशा प्रकारचे लोक समाजामध्ये वावरतात म्हणून चांगलं वागणाऱ्यांचं कौतुक होतं. श्री दत्तगुरूंनी चोवीस गुरू केले होते अशी कथा आहे. याचा अर्थ एवढाच की जेथून जे चांगले मिळाले तेथून ते त्यांनी घेतलं मला वाटतं ही मानसिकता घेऊन आपण जर चाललो तर आपल्याला ज्यांच्या ज्यांच्याकडून काही ना काही शिकायला मिळालं आणि त्याचा चांगला परिणाम आपलं व्यक्तिमत्व साकारण्यात झाला अशा सर्व गुरूंना आपण वंदन केले पाहिजे. असं संस्कृत सुभाषित आहे. इथून जे चांगले मिळते तिथून ते घ्यावे. जिथे काही वाईट आहे ते न घेण्याची प्रवृत्ती आपल्यात निर्माण करावी. लौकिक अर्थाने शाळेतले शिक्षक, महाविद्यालयीन प्राध्यापक, अन्य कुठल्या क्षेत्रामध्ये आपण कार्यरत असू तर तेथील आपल्याला मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक,

# मस्तवाल आमदाराकडून मारहाण, आमदार निवास कुणाकडे गहाण ?



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांची ख्याती एक मस्तवाल, मग्रूर, बेछूट आणि तोंडाला येईल ते बरळणारा आमदार अशी होऊ लागली आहे. राजकारणात एक मानसीकता असावी, मीडियाचे आपल्याकडे लक्ष जात नाही, कोपऱ्यात पडल्यासारखे, दुर्लक्षित होत असल्याचे लक्षात येताच सनसनाटी उडवून देणारे एखादे वक्तव्य करायचे आणि प्रसिद्धी मिळवायची..येन केन प्रकरेण प्रसिद्धीच्या झोकात राहणारी ही मानसीकता!**

### आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये मारहाण..

निकृष्ट अन्न दिले गेले म्हणून आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीनमधील वेटरला बेदम मारतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. किती ओंगळवाणे आणि बीभत्स आहे हे..! स्वतः आमदार असताना आणि आमदार निवासातील कॅन्टीनवर आक्षेप असताना, त्यांना सहज कायदेशीर कारवाई करणे शक्य असताना समोरच्याला मारहाण करण्याचे कारणच काय ? पण, हल्ली हिंसेला प्रतिष्ठा मिळत चाललेली आहे. शिवाय आपण दबंगगिरी करत असल्याचेही लोकांना दाखवायचे आहे. त्यामध्ये चमकोगिरी पण आली आणि शायनिंग पण आले !

### सोशल मीडियाला बातमी चालते..

आपल्या सोशल मीडियावरील लोकही सहज लिहून जातात.. चार लगावल्या पाहिजेत म्हणजे येतील ठिकाणावर ! मनात द्वेष, तिरस्कार, सततचा राग असला, की तो कुठल्याही कारणाने शब्दात किंवा प्रत्यक्ष कृतीत उतरतो. 'हिंसा' हे शस्त्र म्हणून वापरणारे आमदार मनातून पोखरलेले, अशांत असतात, मनाविरुद्ध काही घडले, की हे समोर पंचिंग बॅग असल्यासारखे त्याच्यावर चालून जातात. आपला सगळा राग हिंसेच्या माध्यमातून व्यक्त



करतात, हे नक्की !

### मारहाणीने प्रश्न सुटतात ?

हिंसा ही बेकायदेशीर, असंवैधानिक, नियमबाह्य असतेच असते वर हिंसेने प्रश्नही सुटत नाहीत. हिंसक कृतीने क्षणभर मनातील भावनेचा निचरा होतो बाकी काही नाही. एखाद्या प्रश्नावर काम करायचे तर अभ्यास, कृती आराखडा, सातत्य पूर्ण काम, संयम किती मेहनत असते. ज्यांना हे जमणार नसते ते कमकुवत लोक मारामारीवर उतरत असतात.

### छत्रपतींविरोधातही वक्तव्य !

याच मस्तवाल संजय गायकवाड यांनी पंधरा दिवसांपूर्वी मराठी भाषेची महती सांगताना छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी सुद्धा अनुद्गार काढले होते. छत्रपती शंभूराजांना १४-१४ भाषा येत होत्या, असे सांगून ते थांबले असते तर बरे ! पण त्यापुढे त्यांनी वापरलेली भाषा कोणत्याही आमदाराला शोभणारी नव्हती. अत्यंत खालच्या दर्जाचे उद्गार काढून सुद्धा संजय गायकवाड यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही.. त्यांच्याकडे गांभीर्याने पाहायचे नाही, अशी समज विरोधकांना देण्यात आली, ही बाब जरा जास्तच गंभीर आहे !

### म्हणे, सडलेले जेवण दिल्यामुळे संताप!

आमदार निवासात शिळे जेवण दिल्यामुळे आमदारांना संताप अनावर झाला, असे म्हणून त्यांनी समर्थन केले आहे. पण, टॉवेलमध्येच कॅन्टिनमध्ये आले, कर्मचाऱ्याला धू धू धुतले, हे संजय गायकवाड माध्यमांना सांगत बसले, याचा अर्थ काय घ्यायचा? त्यांनी जी मारहाण केली त्याचा व्हिडिओ काढला आणि तो व्हिडीओ देखील समोर आला आहे.

### तेथे नेमके काय घडले ?

मुंबई स्थित आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये संजय गायकवाड यांनी जेवणाची ऑर्डर दिली. त्यांना ऑर्डरप्रमाणे रूममध्ये जेवणही पुरवण्यात आले. मात्र, जेवणात देण्यात आलेली डाळ आणि भात हे शिळे होते आणि त्याचा सडलेला वास येत होता, असा आरोप करत संजय गायकवाड यांनी थेट आमदार निवासातील कॅन्टीन व्यवस्थापकाला धारेवर धरले. यापूर्वीही, मी कॅन्टीनमधील जेवणाची दोन ते तीन वेळा तक्रार केली असल्याचे गायकवाड यांनी सांगितले आणि सभागृहात हा मुद्दाम उचलणार असल्याची धमकीही दिली.

### संजय गायकवाड काय म्हणाले?

आमदार निवासामध्ये डाळ-भात आणि पोळी असे जेवण मागवले होते. पहिला घास खाल्ला तर आंबट लागला आणि मला उलटीही झाली. त्यानंतर मी डाळीचा वास घेतला, तर भयंकर होता. त्यामुळे मी जाब विचारण्यासाठी कॅन्टिनमध्ये गेलो. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात लोक इथे येतात. तसेच याआधी देखील मी दोन-तीन वेळा त्यांना समज दिली होती. एका आमदाराला हे लोक जर विषारी जेवण देतात, मग सामान्य माणसांचं काय होत असेल?, असा सवाल संजय गायकवाड यांनी उपस्थित केला आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा

## आशिष शेलार : गणेशभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्रातील गणेशभक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी विधानभवनात मोठी घोषणा करत सांगितले की, “गणेशोत्सवाला आता महाराष्ट्र राज्य महोत्सव” म्हणून शासकीय मान्यता दिली जाईल. यामुळे गणेशोत्सवाच्या पारंपरिक आणि सामाजिक योगदानाला अधिकृत स्वरूपात राज्याचा सन्मान मिळणार आहे. भाजप आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत गणेशोत्सवाचे महत्त्व अधोरेखित करत, त्यास शासकीय मान्यता द्यावी व मंडळांना निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली होती. या मागणीला आशिष शेलार यांनी पूर्ण पाठिंबा दर्शवून ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली.**

“गणेशोत्सवाचा सार्वजनिक प्रारंभ १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी केला. तेव्हापासून आजपर्यंत ही परंपरा महाराष्ट्राची शान राहिली आहे. हा उत्सव केवळ धार्मिक नसून सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे हा उत्सव आता महाराष्ट्र राज्याचा अधिकृत महोत्सव म्हणून घोषित करण्यात येईल.” तसेच, गणेशोत्सवाच्या आयोजनावर येणाऱ्या अडथळ्यांविषयी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, “राज्य सरकारचे धोरण गणेशोत्सवासाठी कोणत्याही प्रकारे आडकाठीचे असणार नाही. पीओपी मूर्तीवरील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. विसर्जन परंपरागत पद्धतीनेच व्हावे, यासाठी सरकार न्यायालयात स्पष्ट भूमिका मांडत आहे.” यावेळी शेलार यांनी मागील सरकारवर अप्रत्यक्ष टीका करत म्हटले की, “शंभर वर्षांची परंपरा काही काळ खंडित झाली होती. लालबागचा राजा देखील एक वर्ष बसला नव्हता. ही भूमिका त्या काळातील मुख्यमंत्र्यांनी घेतली होती. आमच्या सरकारने मात्र हे ‘स्पीडब्रेकर’ दूर केले.” या घोषणेमुळे राज्यभरातील गणेश मंडळांमध्ये आणि भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शासकीय मान्यतेमुळे गणेशोत्सवाचे आयोजन अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात होणार असून, याला राज्य सरकारचा पाठिंबा मिळणार आहे.“गणेशोत्सवाचा सार्वजनिक प्रारंभ १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी केला. तेव्हापासून आजपर्यंत ही परंपरा महाराष्ट्राची शान राहिली आहे. हा उत्सव केवळ धार्मिक नसून सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे हा उत्सव आता महाराष्ट्र राज्याचा अधिकृत महोत्सव म्हणून घोषित करण्यात येईल.” तसेच, गणेशोत्सवाच्या आयोजनावर येणाऱ्या अडथळ्यांविषयी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, “राज्य सरकारचे धोरण गणेशोत्सवासाठी कोणत्याही प्रकारे आडकाठीचे असणार नाही. पीओपी मूर्तीवरील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. विसर्जन परंपरागत पद्धतीनेच व्हावे, यासाठी सरकार न्यायालयात स्पष्ट भूमिका मांडत आहे.” यावेळी शेलार यांनी मागील सरकारवर अप्रत्यक्ष टीका करत म्हटले की, “शंभर वर्षांची परंपरा काही काळ खंडित झाली होती. लालबागचा राजा देखील एक वर्ष बसला नव्हता. ही भूमिका त्या काळातील मुख्यमंत्र्यांनी घेतली होती.

### ऐतिहासिक निर्णयाची घोषणा

आमच्या सरकारने मात्र हे ‘स्पीडब्रेकर’ दूर केले.” या घोषणेमुळे राज्यभरातील गणेश मंडळांमध्ये आणि भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शासकीय मान्यतेमुळे गणेशोत्सवाचे आयोजन अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात होणार असून, याला राज्य सरकारचा पाठिंबा मिळणार आहे.महाराष्ट्रातील गणेशभक्तांसाठी आनंदाची बातमी आहे.“गणेशोत्सवाला आता महाराष्ट्र राज्य महोत्सव” म्हणून शासकीय मान्यता दिली जाईल. यामुळे गणेशोत्सवाच्या पारंपरिक आणि सामाजिक योगदानाला अधिकृत स्वरूपात राज्याचा सन्मान मिळणार आहे. भाजप आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत गणेशोत्सवाचे महत्त्व अधोरेखित करत, त्यास शासकीय मान्यता द्यावी व मंडळांना निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली होती. या मागणीला आशिष शेलार यांनी पूर्ण पाठिंबा दर्शवून ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली.

# ठाकरे महाराष्ट्रातले नाहीत, मगध येथून आले

## दोन भाऊ राजकारण करत असल्याचं शंकराचार्यांनी म्हटलं



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्रात मराठी आणि हिंदीचा मुद्दा सध्या चांगलाच चर्चेत आहे. त्रिभाषा सूत्रानुसार तिसरी भाषा पहिलीपासून सुरु करण्याच्या निर्णयाला राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी विरोध दर्शवला. ज्यानंतर पावसाळी अधिवेशन सुरु होण्याच्या एक दिवस आधी सरकारने त्रिभाषा सूत्रासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आणि आधीचे दोन्ही अध्यादेश रद्द केले. यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी वरळी या ठिकाणी विजयी मेळावा घेतला.**

ठाकरे बंधू एकत्र येण्याची ही सुरुवात आहे अशी चर्चा रंगली. दरम्यान शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी ठाकरे कुटुंबच महाराष्ट्रात मगध येथून आलं आहे असं म्हणत हे दोन भाऊ फक्त मराठीच्या नावाने राजकारण करत असल्याचं म्हटलं आहे.कुठलंही कार्य करायचं असेल त्याची सुरुवात मोठ्या स्वरुपात करायची असते. मराठीचा प्रचार प्रसार कुणी करत असेल तर कुणाला काही अडवण्याचा प्रश्न येत नाही. पण मराठी भाषेची ओळख ही कानशिलात लगावण्याची भाषा अशी जर कुणी बनवत असेल तर त्यामुळे मराठीला यश मिळेल की कमी होईल? महाराष्ट्रात राहणारेच मराठीवर प्रेम करतात असं नाही. सगळा देश मराठीवर प्रेम करतो. झाशीची राणी लक्ष्मीबाई कुठून आली होती? कितीतरी नावं घेता येतील. हिंदी ही आपल्या देशाची राजभाषा आहे. देशाच्या बाहेरही अनेक भाग आहेत जिथे मराठी भाषा बोलली जाते असंही अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटलं आहे.मराठीचा आग्रह जे धरत आहेत ते ठाकरे महाराष्ट्राच्या बाहेरुन आले आहेत. त्यांच्याच कुटुंबातील आजोबा-पणजोबांनी जे लिहून ठेवलंय त्यात हे म्हटलं आहे की आम्ही मगधहून आलो होतो. मगधहून तुम्ही इथे आलात तेव्हा तुम्ही मराठी होतात का? महाराष्ट्राने मगधहून आलेल्या ठाकरेंना स्वीकारलं.

### मराठीच्या नावाने राजकारण


त्यांना इतकं मोठं केलं की त्यांचे वंशज मराठीसाठी भांडत आहेत. मराठीला थोबाडीत देणारी भाषा, मारहाण करणारी भाषा बनवायची आहे का? राज ठाकरे जे म्हणाले आहेत की मराठी न बोलणाऱ्यांना थोबाडीत ठेवून द्या पण व्हिडीओ काढून नका. एक माणूस खुलेआम गुन्हा करायला सांगतो आणि पुरावे ठेवू नका म्हणतो आहे. याची दखल सरकारने घेतली पाहिजे असंही शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटलं आहे.“ठाकरेंबाबत मी काही व्यक्तिगत भाष्य करणार नाही. मात्र या दोघांची युती यशस्वी होईल असं वाटत नाही. कारण राज ठाकरे यांचं राजकारण करण्याची पद्धत वेगळी आहे. उद्धव ठाकरेंच्या राजकारणाची पद्धत वेगळी आहे. तसंच त्यांचे जे सहकारी सध्या आहेत त्यांचीही धोरणं वेगळी आहेत. त्यामुळे हे दोन बंधू एकसाथ जास्त काळ चालू शकणार नाहीत. कारण राज ठाकरे एका समाजाला घेऊन चालतात.

# उदयपूर फाईल्स प्रदर्शित होण्यास स्थगिती

## केंद्र सरकारचे तोडगा काढण्याचे न्यायालयाचे निर्देश

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**दिल्ली उच्च न्यायालयाने वादग्रस्त उदयपूर फाईल्स : कन्हैया लाल टेलर मर्डर या सिनेमावर बंदी घातली आहे. केंद्र सरकारने याबाबत निर्णय घ्यावा असं न्यायालयाने म्हटलं आहे. इस्लामी धर्मगुरुंची संघटना असलेल्या जमीयत उलेमा ए हिंदी आणि इतर याचिकाकर्त्यांनी केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळ (CBFC) द्वारा न्यायालयात धाव घेतली होती. आता या प्रकरणी केंद्राने निर्णय घ्यावा असं न्यायालयाने म्हटलं आहे.**




केंद्र सरकारकडून याचिकाकर्त्यांच्या याचिकेबाबत जोपर्यंत अंतरिम दिलासा देण्याचा निर्णय होत नाही तोपर्यंत हा चित्रपट प्रदर्शित करु नये असे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले. शुक्रवारी हा चित्रपट प्रदर्शित होणार नाही. जमीयत उलेमा ए हिंदचे अध्यक्ष अरशद मदानी यांनी आणि इतर याचिकाकर्त्यांनी चित्रपटाच्या विरोधात याचिका दाखल केली होती. दरम्यान या चित्रपटावर बंदी घालण्यात आली आहे आणि केंद्र सरकारने तोडगा काढावा असं न्यायालयाने म्हटलं आहे. उदयपूरचा टेलर कन्हैया लालची २०२२ मध्ये हत्या झाली. उदयपूर फाईल्स याच घटनेवर आधारित आहे. शुक्रवारी म्हणजेच ११ जुलैला हा चित्रपट प्रदर्शित होणार होता. मात्र आता या चित्रपटावर दिल्ली उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. जमीयत उलेमा ए हिंद आणि इतर याचिकाकर्त्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यासाठी याचिका दाखल केली होती. कन्हैया लाल हत्याकांड प्रकरणातील आरोपी मोहम्मद जावेद याने हा चित्रपट प्रदर्शित होऊ नये यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ती याचिका न्यायालयाने फेटाळली होती. त्यानंतर हा चित्रपट प्रदर्शित होईल असं वाटलं होतं. मात्र तसं घडलं नाही, आज दिल्ली उच्च न्यायालयाने या चित्रपटावर बंदी घातली आहे. LIVE LAW ने हे वृत्त दिलं आहे.उदयपूरमध्ये टेलरिंगचं (शिवणकाम) काम करणाऱ्या कन्हैयालाल यांची जून २०२२ मध्ये निर्घृण हत्या करण्यात आली होती. नुपूर शर्मा हिने मोहम्मद पैगंबर यांच्याबद्दल एक आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. कन्हैयालाल यांनी या वक्तव्याचं समर्थन करणारी पोस्ट समाजमाध्यमांवर शेअर केली होती. त्यामुळे मोहम्मद रियाज व मोहम्मद गौस या दोघांनी मिळून कन्हैयालाल यांची हत्या केली. या हत्या प्रकरणात इतरही काहीजण सहभागी असल्याचा दावा केला जात आहे. 'उदयपूर फाइल्स' चित्रपटाचं प्रदर्शन रोखण्यात यावं यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका करणारा जावेदही या हत्या प्रकरणातील एक आरोपी आहे. केंद्र सरकारकडून याचिकाकर्त्यांच्या याचिकेबाबत जोपर्यंत अंतरिम दिलासा देण्याचा निर्णय होत नाही तोपर्यंत हा चित्रपट प्रदर्शित करु नये असे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले. शुक्रवारी हा चित्रपट प्रदर्शित होणार नाही. जमीयत उलेमा ए हिंदचे अध्यक्ष अरशद मदानी यांनी आणि इतर याचिकाकर्त्यांनी चित्रपटाच्या विरोधात याचिका दाखल केली होती. दरम्यान या चित्रपटावर बंदी घालण्यात आली आहे आणि केंद्र सरकारने तोडगा काढावा असं न्यायालयाने म्हटलं आहे. उदयपूरचा टेलर कन्हैया लालची २०२२ मध्ये हत्या झाली.

### या चित्रपटावर बंदी घातली आहे

उदयपूर फाईल्स याच घटनेवर आधारित आहे. शुक्रवारी म्हणजेच ११ जुलैला हा चित्रपट प्रदर्शित होणार होता. मात्र आता या चित्रपटावर दिल्ली उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. जमीयत उलेमा ए हिंद आणि इतर याचिकाकर्त्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यासाठी याचिका दाखल केली होती. कन्हैया लाल हत्याकांड प्रकरणातील आरोपी मोहम्मद जावेद याने हा चित्रपट प्रदर्शित होऊ नये यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ती याचिका न्यायालयाने फेटाळली होती. त्यानंतर हा चित्रपट प्रदर्शित होईल असं वाटलं होतं. मात्र तसं घडलं नाही, आज दिल्ली उच्च न्यायालयाने या चित्रपटावर बंदी घातली आहे. LIVE LAW ने हे वृत्त दिलं आहे.उदयपूरमध्ये टेलरिंगचं कन्हैयालाल यांची जून २०२२ मध्ये निर्घृण हत्या करण्यात आली होती.

# सरकारी संस्थांवर बलुचिस्तानचे हल्ले

## बलुचिस्तानचे "ऑपरेशन बाम" मोहिमेची जबाबदारी स्वीकारली

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट या बंडखोर संघटनेने मंगळवारी रात्री उशिरा बलुचिस्तानच्या अनेक जिल्ह्यांमध्ये सरकारी संस्था आणि लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य करून हल्ले केले. गेल्या काही वर्षांत त्यांनी केलेल्या सर्वात व्यापक हल्ल्यांपैकी हा हल्ला होता.बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट या संघटनेने "ऑपरेशन बाम" नावाच्या मोहिमेची जबाबदारी स्वीकारली असून, पाकिस्तानविरुद्ध दशकांपासून सुरू असलेल्या लढाईत एक नवीन अध्याय सुरू करण्याची शपथ घेतली आहे, असे वृत्त एएनआय वृत्तसंस्थेने दिले आहे.**



बलुचिस्तान लिबरेशन फ्रंटने बलुचिस्तानच्या पंजगुर, सुराब, केच आणि खारानमध्ये किमान १७ हल्ले केले आहेत. या हल्ल्यांमुळे वाहतूक विस्कळीत झाली असून, प्रशासकीय पायाभूत सुविधांचेही नुकसान झाले आहे. याचबरोबर त्यांनी पाकिस्तानी लष्करी चौक्यांवरही हल्ले केले आहेत.या हल्ल्यांमुळे किती नुकसान झाले, याबाबत पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही, परंतु स्थानिक सूत्रांनी या हल्ल्यांमुळे मोठे नुकसान झाल्याचे वृत्त दिले आहे. एका निवेदनात, बीएलएफचे प्रवक्ते मेजर ग्वाहराम बलोच यांनी या मोहिमेचे वर्णन "बलुच राष्ट्रीय मुक्ती युद्धातील एक नवीन पहाट" असे केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, ही कारवाई मकरान किनाऱ्यापासून कोह-ए-सुलेमान पर्वतांपर्यंत होती. आमच्या प्रतिकाराने आता एका नवीन टप्प्यात प्रवेश केला आहे. ऑपरेशन बाम, बलुच सैनिक मोठ्या भागांतही मोठ्या प्रमाणात, समन्वयित ऑपरेशन्स करण्यास सक्षम आहेत, हे दाखवण्यासाठी राबवण्यात आले आहे".मेजर ग्वाहराम यांनी असा दावा केला की, सुरक्षा दलांचे "मानवी आणि भौतिक नुकसान" करण्यासाठी हे हल्ले काळजीपूर्वक करण्यात आले होते.

### लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य

दरम्यान, या हल्ल्यांचे प्रमाण आणि अचूकतेमुळे पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात बंडखोरी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते. बुधवारी सकाळपर्यंत, पाकिस्तानी सुरक्षा दलांनी हल्ले झालेल्या जिल्ह्यांमध्ये शोधमोहीम सुरू केली होती, तर केच आणि पंजगुरच्या काही भागांमध्ये संपर्क सेवा बंद करण्यात आल्या होत्या. बीएलएफने सांगितले की, ते ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर याबाबतची अधिक माहिती जाहीर करतील.बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट या बंडखोर संघटनेने मंगळवारी रात्री उशिरा बलुचिस्तानच्या अनेक जिल्ह्यांमध्ये सरकारी संस्था आणि लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य करून हल्ले केले. गेल्या काही वर्षांत त्यांनी केलेल्या सर्वात व्यापक हल्ल्यांपैकी हा हल्ला होता.बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट या संघटनेने "ऑपरेशन बाम" नावाच्या मोहिमेची जबाबदारी स्वीकारली.

# ठाकरे बंधू एकत्र येताच आदेशनी दिली प्रतिक्रिया



शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासूनच हिंदी विषय लागू करण्याच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला. पहिलीपासूनच्या हिंदी भाषा सक्तीला राजकीय वर्तुळातूनच नव्हे; तर मनोरंजन क्षेत्रातूनही जोरदार अनेकांनी विरोध दर्शवला होता. या विरोधानंतर राज्य सरकारने हिंदी भाषा अनिवार्यचा जीआर रद्द करत यावर पुर्नविचार करण्यात येणार असल्याचं सांगितलं. जीआर रद्द झाल्यानंतर ५ जुलै रोजी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्रित येत वरळीमध्ये विजयी मेळाव्याचे आयोजन केलं होतं. या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. या मेळाव्यात ठाकरे बंधूंना एकत्र पाहिल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्राचं स्वप्न पूर्ण झाल्याच्या भावना अनेकांनी व्यक्त केल्या.तब्बल २० वर्षांनंतर ठाकरे बंधू एकत्र आल्याचं पाहून अनेकांनी आनंद व्यक्त केला होता. ठाकरे बंधूंना एकाच व्यासपीठावर एकत्र पाहून केवळ राज आणि उद्धव ठाकरे यांच्या कार्यकर्त्यांनीच नव्हे तर मराठी मनोरंजन विश्वातीलही अनेकांनी पोस्ट शेअर केल्या होत्या. अशातच आता आदेश बांदेकर यांनी ठाकरे बंधूंच्या एकत्र आल्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याबद्दल आदेश बांदेकरांनी सकाळला दिलेल्या मुलाखतीत असं म्हटलं, "आम्ही दिवसभर वारी करत होतो. सकाळी सहा वाजल्यापासून ते रात्री एक-दीड वाजेपर्यंत आम्ही वारीत असायचो. वारीत बऱ्याच ठिकाणी रेंज नव्हती. तेव्हा आम्ही एका क्षणाची आतुरतेने वाट पाहत होतो, तो क्षण म्हणजे सोपानदेव महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या भेटीचा. तो योग इतका चांगला होता की, आम्ही सगळेच वारकरी त्याची वाट पाहत होतो."यापुढे त्यांनी सांगितलं, "सोपान महाराजांची पालखी थांबलेली असते. मग संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी येते आणि तिथे त्या दोन बंधूंची भेट होते. त्यानंतर सोपानदेव महाराजांकडून एक श्रीफळ संत ज्ञानेश्वर महाराजांच्या रथावर दिलं जातं.

# कपिलच्या कॅनडामधील कॅफेवर गोळीबार



'द ग्रेट इंडियन कपिल शो'मुळे घराघरांत लोकप्रिय झालेला कॉमेडियन कपिल शर्मा संबंधित एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. कपिलच्या कॅनडामधील सरे इथे नुकत्याच सुरू केलेल्या 'कॅप्स कॅफे'वर गोळीबार करण्यात आला आहे. कपिल शर्मा आणि त्याची पत्नी गिन्नी यांनी काही दिवसांपूर्वीच हा कॅफे सुरू केला होता. कॅफे सुरू झाल्याच्या अवघ्या तीन दिवसांतच त्यावर हल्ला करण्यात आला आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्या व्हिडीओमध्ये एक व्यक्ती गाडीत बसून बंदुकीने कॅफेच्या दिशेने गोळ्या झाडताना दिसत आहे. या घटनेची जबाबदारी खलिस्तानी दहशतवादी हरजीत सिंग उर्फ लड्डी याने घेतली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, या हल्ल्याची जबाबदारी बब्बर खालसा इंटरनॅशनल (BKI) या खलिस्तानी दहशतवादी संघटनेने घेतली आहे. या संघटनेशी संबंधित हरजीत सिंग लड्डी हे या प्रकरणात मुख्य नाव म्हणून समोर आलं आहे. लड्डी हा भारताच्या NIA (नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी) च्या 'मोस्ट वॉन्टेड' दहशतवाद्यांपैकी एक आहे आणि याआधीही अनेक गंभीर घटनांमध्ये त्याचं नाव आल्याचं वृत्त आहे.हरजीत सिंग लड्डीने कपिल शर्माच्या कॅफेवर झालेल्या गोळीबारामागे आपणच असल्याचा दावा सोशल मीडियावर केला आहे. सुदैवाने या घटनेत कुणालाही इजा झाली नाही, मात्र आसपासच्या परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. सध्या स्थानिक पोलिस आणि तपास यंत्रणांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. या कॅफेची पहिली झलक शेअर केली होती. गुलाबी रंगाच्या थीममध्ये सजवलेली ही जागा अनेकांच्या पसंतीस पडली. एका कंटेंट क्रिएटरने शेअर केलेल्या व्हिडीओद्वारे कॅफेमधील गुलाबी आणि पांढऱ्या रंगांच्या सजावटीची आणि आकर्षक इंटिरियरची खास झलक पाहायला मिळाली.

# अभिनेत्री बरोबर केले घाणेरडे कृत्य

मंदिरात आशीर्वाद देण्याच्या बहाण्याने एका सौंदर्यवतीची छेडछाड केल्याचा आरोप असलेल्या हिंदू पुजाऱ्याचा मलेशिया पोलिसांनी शोध सुरू केला आहे. मलेशियात जन्मलेली भारतीय वंशाची अभिनेत्री आणि टीव्ही होस्ट लिशालिनी कनारन हिने एक धक्कादायक आरोप केला आहे. तिने पुजाऱ्यावर आशीर्वाद देण्याच्या बहाण्याने लैंगिक शोषण केल्याचा आरोप केला आहे. हे प्रकरण आता मलेशियन पोलिसांपर्यंत पोहोचले आहे आणि आरोपी पुजाऱ्याचा शोध सुरू आहे. अभिनेत्रीने सोशल मीडियावर एक लांब पोस्ट शेअर करून तिच्यावर झालेला अत्याचार शेअर केला आहे. लिशालिनी कनारन हिच्या पोस्टनुसार, गेल्या शनिवारी सेपांग येथील मरिअम्मन मंदिरात ही घटना घडली. सोशल मीडियावर एक लांब पोस्ट लिहून तिने आपला अनुभव शेअर केला, तेव्हा लोकांना याची माहिती मिळाली. लिशालिनी काही काळापासून आध्यात्मिकतेकडे वळली होती आणि नियमितपणे मंदिरात जात होती. तिची आई भारतात असल्याने ती त्या दिवशी एकटीच गेल्याचे तिने सांगितले. अभिनेत्रीच्या पोस्टनुसार तिने सांगितले की, पुजारी, जो सहसा तिला धार्मिक विधींमध्ये मार्गदर्शन करतो.

# गोल्डन ग्लोबचं स्वप्न भंगलं!

'आरआरआर' सिनेमातील 'नाटू नाटू' गाण्याला दोन वर्षांपूर्वी गोल्डन ग्लोब अवॉर्ड मिळाला होता. त्यानंतर यावर्षी 'ऑल वी इमॅजिन अॅज लाइट' या भारतीय चित्रपटाला प्रतिष्ठित गोल्डन ग्लोब अवॉर्ड्समध्ये नामांकन मिळालं होतं. 'नाटू नाटू'नंतर पुन्हा एकदा या चित्रपटामुळे गोल्डन ग्लोब भारतात येईल, अशी आशा होती. मात्र भारताचं हे स्वप्न भंगलं आहे. हॉलीवूडमधील अनेक मोठ्या चित्रपटांशी स्पर्धा केल्यानंतर पायल कपाडियाच्या 'ऑल वी इमॅजिन अॅज लाइट' नॉन-इंग्लिश फीचर कॅटेगरीतील सर्वोत्कृष्ट मोशन पिक्चरसाठी गोल्डन ग्लोब पुरस्कार गमावला आहे.



# गोविंदामुळे टीनाला बॉलीवूडमध्ये मिळाले नाही

गोविंदा हे ९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक म्हणून ओळखले जातात. त्यांचा अभिनय व डान्स याची त्यांनी एक वेगळी स्टाइल निर्माण केली. आजही त्यांचे अनेक चित्रपट लोकप्रिय आहेत. याशिवाय त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील ते व त्यांचे कुटुंब अनेकदा चर्चेत असलेले पाहायला मिळते. आता गोविंदा यांची पत्नी सुनिता आहुजाने एका मुलाखतीत त्यांची मुले टीना व यश यांच्या बॉलीवूडमधील करिअरबद्दल वक्तव्य केले आहे.लोकप्रिय अभिनेते गोविंदा यांची पत्नी सुनिता आहुजा स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. नुकतीच तिने हिंदी रश या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी नेपोटिझम तसेच इंडस्ट्रीमध्ये त्यांची मुलगी काम करणार का, याविषयी वक्तव्य केले आहे. या मुलाखतीत सुनिता आहुजाने म्हटले, "तिला चांगला प्रतिसाद मिळत होता, पण सगळ्यांनी असे एक भीतीचे वातावरण तयार केले की जर टीना काम करत असेल तर गोविंदासुद्धा सेटवर येतील आणि ते कडक शिस्तीचे वडील असल्यामुळे इतर लोकांना बोलतील, शिवीगाळ करतील. मला कळत नाही, लोक अशाप्रकारच्या खोट्या गोष्टी का तयार करतात? ती चांगल्या भूमिकेची वाट बघत आहे. घर चालवण्यासाठी तिला संघर्ष करायची गरज नाही. जर तिला चांगली संधी मिळाली तर ती का काम करणार नाही? तुम्ही तिला संधी तरी द्या."याबरोबरच सुनिता आहुजाने बॉलीवूडमधील नेपोटिझमवर टीका केली. विशिष्ट कलाकारांच्या मुलांना काम मिळते.

# मित्रांनो पुन्हा एकदा सुरु झालं, बोरिंग..!

## इंग्लंडच्या बॅझबॉलची गिलने अशी उडवली खिल्ली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कसोटी क्रिकेटमध्ये खेळाडूंची कसोटी पाहायला मिळते. फलंदाजांना एक- एक धाव घेण्यासाठी संघर्ष करावा लागतो. तर गोलंदाजांना विकेट्स काढण्यासाठीही प्रचंड संघर्ष करावा लागतो. त्यामुळे धावांची गती ही फार कमी असते. पण, इंग्लंडने कंटाळवाणं वाटणारं कसोटी क्रिकेट रोमांचक बनवण्यासाठी बॅझबॉल सुरू केलं होतं. बॅझबॉलमध्ये इंग्लंडच्या फलंदाजांनी गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. पण, तिसऱ्या कसोटीत इंग्लंडची धावांची गती पुन्हा एकदा कमी झाली आहे. त्यामुळे भारताचा कर्णधार शुबमन गिलची खिल्ली उडवली आहे. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.**



न्यूझीलंडचा माजी खेळाडू ब्रेंडन मॅक्यूलम इंग्लंडचा मुख्य प्रशिक्षक बनल्यापासून इंग्लंडच्या फलंदाजीत खूप मोठा फरक पडल्याचे पाहायला मिळाले आहे. बॅझबॉल म्हणजे कसोटी क्रिकेटमध्ये गोलंदाजांवर हल्लाबोल करायचा आणि वेगाने धावा गोळा करायच्या. इंग्लंडने या मालिकेतील सुरूवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये बॅझबॉल स्टाईल क्रिकेट खेळून धावा गोळा केल्या आहेत. मात्र, तिसऱ्या सामन्यात इंग्लंडच्या फलंदाजांनी संथ गतीने फलंदाजी केली आहे. त्यामुळे भारतीय गोलंदाज इंग्लंडच्या फलंदाजांची खिल्ली उडवताना दिसून आले आहेत. तर झाले असे की, या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडकडून जॅक क्रॉली आणि बेन डकेट ही जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात आली. ही जोडी आक्रमक सुरुवात करेल असं वाटलं होतं. पण, तसं काहीच झालं नाही. भारतीय गोलंदाजांसमोर इंग्लंडचे फलंदाज सावध होऊन फलंदाजी करताना दिसले. बुमराह आणि सिराज यांनी या जोडीला अडकवून ठेवलं. तर नितीश कुमार रेड्डीने एकाच ओव्हरमध्ये जॅक क्रॉली आणि बेन डकेटला बाद करत माघारी धाडलं. त्यानंतर जो रूट आणि ओली पोपने मिळून इंग्लंडचा डाव सावरला. दोघांनी पहिल्या डावातील पहिल्या सत्रात ३.३२ च्या सरासरीने धावा केल्या. तर दुसऱ्या डावात ही सरासरी आणखी खालावली. दुसऱ्या डावात या जोडीने २.९२ च्या सरासरीने धावा केल्या.तर झाले असे की, भारतीय वेगवान गोलंदाजांसमोर इंग्लंडचे फलंदाज सावध होऊन फलंदाजी करताना दिसले. भारतीय गोलंदाजांच्या गोलंदाजीवर इंग्लंडचे फलंदाज संघर्ष करताना दिसले. त्यावेळी गिलने इंग्लंडच्या फलंदाजांची चांगलीच फिरकी घेतली. जो रूट आणि पोप फलंदाजी करत असताना गिल म्हणाला, " मित्रांनो, चला पुन्हा सुरू झालं ते बोरिंग टेस्ट क्रिकेट.." गिलचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे.न्यूझीलंडचा माजी खेळाडू ब्रेंडन मॅक्यूलम इंग्लंडचा मुख्य प्रशिक्षक बनल्यापासून इंग्लंडच्या फलंदाजीत खूप मोठा फरक पडल्याचे पाहायला मिळाले आहे. बॅझबॉल म्हणजे कसोटी क्रिकेटमध्ये गोलंदाजांवर हल्लाबोल करायचा आणि वेगाने धावा गोळा करायच्या. इंग्लंडने या मालिकेतील सुरूवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये बॅझबॉल स्टाईल क्रिकेट खेळून धावा गोळा केल्या आहेत. मात्र, तिसऱ्या सामन्यात इंग्लंडच्या फलंदाजांनी संथ गतीने फलंदाजी केली आहे. त्यामुळे भारतीय गोलंदाज इंग्लंडच्या फलंदाजांची खिल्ली उडवताना दिसून आले आहेत. तर झाले असे की, या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडकडून जॅक क्रॉली आणि बेन डकेट ही जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात आली. ही जोडी आक्रमक सुरुवात करेल असं वाटलं होतं. पण, तसं काहीच झालं नाही. भारतीय गोलंदाजांसमोर इंग्लंडचे फलंदाज सावध होऊन फलंदाजी करताना दिसले.

### गिलचा व्हिडीओ व्हायरल

बुमराह आणि सिराज यांनी या जोडीला अडकवून ठेवलं. तर नितीश कुमार रेड्डीने एकाच ओव्हरमध्ये जॅक क्रॉली आणि बेन डकेटला बाद करत माघारी धाडलं. त्यानंतर जो रूट आणि ओली पोपने मिळून इंग्लंडचा डाव सावरला. दोघांनी पहिल्या डावातील पहिल्या सत्रात ३.३२ च्या सरासरीने धावा केल्या. तर दुसऱ्या डावात ही सरासरी आणखी खालावली. दुसऱ्या डावात या जोडीने २.९२ च्या सरासरीने धावा केल्या.तर झाले असे की, भारतीय वेगवान गोलंदाजांसमोर इंग्लंडचे फलंदाज सावध होऊन फलंदाजी करताना दिसले. भारतीय गोलंदाजांच्या गोलंदाजीवर इंग्लंडचे फलंदाज संघर्ष करताना दिसले. त्यावेळी गिलने इंग्लंडच्या फलंदाजांची चांगलीच फिरकी घेतली. जो रूट आणि पोप फलंदाजी करत असताना गिल म्हणाला, " मित्रांनो, चला पुन्हा सुरू झालं ते बोरिंग टेस्ट क्रिकेट.." गिलचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे.कसोटी क्रिकेटमध्ये खेळाडूंची कसोटी पाहायला मिळते.

# मोहम्मद सिराज- रूटमध्ये बाचाबाची

## या बाचाबाचीचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लॉर्ड्सच्या मैदानावर भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना सुरू आहे. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या डावात फलंदाजीला आलेल्या इंग्लंडला सुरूवातीलाच २ मोठे धक्के बसले आहेत. नितीश कुमार रेड्डीने सलामीवीर फलंदाज जॅक क्रॉली आणि बेन डकेटला स्वस्तात माघारी धाडलं आहे.**




त्यानंतर जो रूट आणि ओली पोपने मिळून इंग्लंडचा डाव सांभाळला आहे.जो रूट हा इंग्लंडचा प्रमुख फलंदाज आहे. त्यामुळे जो रूट खेळपट्टीवर टिकून राहणं किती महत्वाचं आहे, हे सर्वांना माहीत आहे.इंग्लंडला सुरूवातीला २ मोठे धक्के बसल्यानंतर, जो रूटवर एक बाजू धरून ठेवण्याची मोठी जबाबदारी होती. त्याने ही जबाबदारी योग्यरित्या पार पाडली. पण सिराजने त्याचं लक्ष विचलित करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. यादरम्यान दोघांमध्ये बाचाबाची झाल्याचेगी पाहायला मिळाले.तर झाले असे की, भारतीय संघाकडून पहिल्या डावातील ३१ वे षटक टाकण्यासाठी मोहम्मद सिराज गोलंदाजीला आला. या षटकात सिराजने सर्व ६ चेंडू अचूक टप्प्यावर टाकले. पण रूटने ते चेंडू सोडून दिले आणि स्टंपवर येणारे चेंडू खेळून काढले. दरम्यान षटकातील दुसरा चेंडू टाकल्यानंतर, सिराज रूटकडे गेला आणि त्याला काहीतरी बोलताना दिसून आला. मात्र, रूटने काहीच प्रत्युत्तर दिलं नाही. या बाचाबाचीचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

### इंग्लंडला सुरुवातीलाच 2 मोठे धक्के

या सामन्यात इंग्लंडचा संघ पहिल्या डावात फलंदाजीसाठी मैदानात आला आहे. मात्र, डावाची सुरुवात करताना इंग्लंडला हवी तशी सुरूवात करता आलेली नाही. डकेटची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी आली. या जोडीकडून चांगल्या सुरुवातीची अपेक्षा होती. पण नितीश कुमार रेड्डीने आपल्या पहिल्याच षटकात दोघांनाही बाद करत माघारी धाडलं. आधी बेन डकेट लेग स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर बाद झाला. त्यानंतर षटकातील शेवटच्या चेंडूवर जॅक क्रॉली देखील बाद होऊन माघारी परतला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज
ePaper
। शुक्रवार ।
। दि. 11जुलै 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



BLOSSOM YOUR KNOWLEDGE

**Not just education, but Personality transformation.**

**ADMISSIONS OPEN for 2025-26**

- CBSE curriculum
- Initiatives like 'Read-to-Lead'
- Tradition of 100% result

Gayatri English Medium School & Junior College, Charholi

**95277 64646 / 77967 67292**


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE


# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK, wipro, NTT DATA, virtusa, B&R, Emcure, KNORR-BREMSE, NuLife, CitiusTech, SHL, McKinley Rice, bvg, Technouniq, RPG, CONSTROLOGIX, NASSCOM FOUNDATION, INDOVANCE, Tech Mahindra, Datatech Labs, EMERSON, newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**